विकासनामा

पर्यायी विकास

चन्द्रशेखर पुरन्दरे

आपले उद्दिष्ट पर्यायी विकास, शाश्वत विकास असल्यास विद्यमान व्यवस्थेला संपूर्ण पर्याय उभा करण्याची जबाबदारी आपल्यावर येते.

त्या संदर्भात खालील मुद्दे विचारार्ह वाटावेत.

एक - लोकशाही - त्याला जोडून निर्वाचित लोकशाहीचे सद्य स्वरूप

दोन - देशाची संकल्पना - त्याला जोडून संविधान

आणि तीन - मूलतत्त्ववाद

लोकशाही म्हणजे निर्वाचित लोकशाही ही समजूत दृढ झाली आहे. वस्तुत: लोकशाही या अधिक व्यापक संकल्पेनेचा हा दुर्दैवी संकोच आहे. निर्वाचनाच्या प्रक्रियेतच सत्तेची उतरंड अन्तर्भूत आहे. निर्वाचित प्रतिनिधी स्थानिक-राज्य-केंद्र अशा उत्तरोत्तर पातळ्यांवर अधिकाधिक सत्ता मिळवतो. त्याच्या हितसंबंधांना प्राधान्य रहाते. मतदारांचे हितसंबंध, विशेषत: दुर्लक्षित समूहांचे हितसंबंध या प्राधान्यात असतीलच असे नाही. ते बहुधा दुर्लक्षितच रहातात. [शेतकरी]. निर्वाचनामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होण्याऐवजी केंद्रीकरण बळकट होत जाते. लोकशाहीचा व आंदोलनांचा उद्देश हा आहे/असावा की सत्तेचे पूर्ण विकेंद्रीकरण 'शेवटच्या माणसाला' सक्षम करेल. या उद्दिष्टाच्या दिशेने निर्वाचित लोकशाही जात नाही.

त्यात निर्वाचित लोकशाहीचे जागतिक चित्र उत्साहवर्धक नाही. २०१८ पर्यंत सतत तेराव्या वर्षी जगात व्यक्ति-स्वातंत्र्याचा संकोच होत आलेला आहे. संपूर्ण एकाधिकारशाही [उदा. सौदी अरेबिया, चीन] सोडता १९८५ ते २०१५ दरम्यान, इतर एकाधिकारशाही राष्ट्रे [रशियाच्या विघटनानंतर जन्माला आलेली राष्ट्रे] आजवर निदान दिखाव्याच्या निर्वाचित लोकशाही होत्या. त्या आता तो देखावाही सोडून देत आहेत. १९८९ च्या पूर्व व पश्चिम जर्मनीच्या एकीकरणा-नंतर नव्याने लोकशाही झालेल्या पूर्व युरोपमध्ये लोकशाही आली पण अल्पावधीतच उजव्या आक्रमक शक्तींनी सरकारे ताब्यात घेतली व निर्वाचित एकाधिकारशाहीकडे वाटचाल चालू आहे. [हंगेरीत ते सरकारही आहे]. आजवर निर्वाचित लोकशाहीचा बऱ्यापैकी आदर्श मानल्या जाणाऱ्या स्थिर पश्चिम युरोपमध्येही उजव्या शक्ती सरसावत आहेत किंवा सत्तेवर आल्या आहेत. अल्पसंख्याकांची गळचेपी, आफ्रिका, मध्य-पूर्व येथून स्थलांतरण करू इच्छिणाऱ्या लोकांना प्रवेशबंदी इत्यादी धोरणे ही सरकारे राबवत आहेत. [इटली]. डिसेंबर २०१० ला लोकशाहीच्या मागणीसाठी सुरू झालेला अरब वसंत अल्पायुषी ठरला - इजिप्तमध्ये लगेचच लष्करशाही आली, लीबियात अराजक आले.

अमेरिकेतील ट्रम्पचा उदय, तुर्कस्तानातील एर्दोगनचे स्वकेंद्रित सरकार करण्याचा प्रयत्न, ब्राझीलचा उजव्या शक्तींच्या पाठिंब्यावरील नव-निर्वाचित अध्यक्ष, फिलिपिन्सचा अध्यक्ष हे याच मालिकेत येतात. या राजवटी प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्यावर अधिकाधिक निर्बंध आणतात. आपल्याविरोधी बातमीला ट्रम्पमहाशय fake news म्हणतात,एर्दोगनने राजकीय विरोधकांना आणि देशवार पहाता जगातील सगळ्यात जास्त पत्रकारांना कैदेत टाकले आहे. तुर्कस्तानमध्ये कुर्द अल्पसंख्याकांची दडपणूक वाढतच आहे. या राजवटी पर्यावरणाची हानी सरळ नाकारतात किंवा हानीत भर घालतात [अमेरिका, ब्राझील].

जागतिक स्तरावर ज्या देशात निर्वाचित लोकशाही आहेत, तेथे मतदानाचे प्रमाण खालावताना दिसते. १९४० च्या दशकापासून १९८० च्या दशकापर्यंत पात्र मतदारांपैकी मतदान करणारे ७७-७८ टक्के असत. १९९०च्या दशकात हे प्रमाण ७० टक्केवर आले, २०११ ते २०१५ या दरम्यान ते ६६ टक्केवर आणि २०१८ ला ६३ टक्केवर. निर्वाचित लोकशाहीचा एक अंतर्विरोध म्हणजे, जे मतदान करतात त्यांच्या काही टक्केंवर विजेता ठरतो. आणि अशा विजेत्यांच्या एकूण संख्येवर पुढचे सरकार ठरते. समजा, ६३ टक्केंच्या अगदी ५०टक्केंनी एक पक्ष निवडला. तर तो सत्तेवर येतो. म्हणजे ३१-३२ टक्के लोक सरकार ठरवतात आणि ते

स्वत:ला प्रातिनिधिक मानते. धोरणात्मक मुद्द्यावर सार्वमत झाले तरी हे असंतुलन टळत नाही. ब्रिटनने युरोपिअन युनिअनमध्ये रहावे किंवा नाही [brexit] या मुद्यावर ४९ टक्केंनी रहावे असा कौल दिला तर ५१ टक्केंनी युनिअनमधून बाहेर पडावे असा कौल दिला. सरकारने ४९ टक्केंकडे पूर्ण दुर्लक्ष केले आणि त्यांना ते निमूटपणे मान्य करावे लागले. दुसरे सार्वमत न घेता सरकारने brexit ची तयारी सुरू केली. ही निर्वाचित लोकशाहीची परिस्थिती लोकशाहीची जननी मानल्या जाणाऱ्या ब्रिटनमध्ये.

तिसरा मुद्दा पक्षीय राजकारणाच्या मर्यादेचा. आपल्याकडे हे वारंवार दिसून येत आहे. त्याचे कारण म्हणजे पर्यायी विकासाच्या दृष्टीने पक्षीय राजकाणाची संदर्भ चौकट अतिशय तोकडी आहे. मुख्य प्रवाही जागतिक 'अर्थशास्त्रीय' लाटा, बदलते लोकमत आणि राजकीय मजबुरी हे प्रामुख्याने ती संदर्भ चौकट ठरवतात. त्यात दगडापेक्षा वीट मऊ एवढाच वाव विविध पक्षांना असतो. भले ते अवसान संपूर्ण परिवर्तनाचे आणोत. आयाराम गयाराम जमान्यापासून आजच्या [लेख लिहिण्याच्या वेळेच्या] कर्नाटक, गोवा येथील पक्षांतरात हे स्पष्ट होत आहे.

दुसऱ्या शब्दात राजकारण हे श्रेयस्कर दिशेने समाज-परिवर्तन करण्याचे साधन आहे का असा संशय येतो. मतदारांच्या संख्येतील घटीत ही उदासीनता प्रतिबिंबित होते. निवडणुका समाजाला उथळ करतात. हे भारतातच नव्हे जगभर आढळते.

अशा पार्श्वभूमीवर जनआंदोलनांची जबाबदारी वाढते. आपण ज्यांच्यात काम करतो, जे आपले प्रभावक्षेत्र आहे, त्यांना लोकशाहीच्या या दूषित राजकारणात आणणे कितपत प्रस्तुत आहे? आंदोलने उपेक्षित समूहांमध्ये जन-जागृतीचे काम करतात. व्याख्येनेच ती व्यवस्थेच्या बाहेर असतात. त्यामुळे त्यांना व्यवस्थेला आव्हान देण्याचा नैतिक अधिकार आहे. पक्षीय राजकारण त्यांना हां हां म्हणता गिळून टाकेल - जॉर्ज फर्नांडिस, शरद जोशी. आंदोलनांनी पक्षीय राजकारणात येऊ नये हे माझे वैयक्तिक मत आहे.

देशाची संकल्पना

देश ही संकल्पना व्याख्येनेच 'अंतर्गत हिंसेची मक्तेदारी' या गृहीतावर आधारित आहे. त्यामुळे जन -आंदोलनांना देशाची कोणती व्याख्या अभिप्रेत आहे हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. नकाशावरचा भौगोलिक भारत, भा.ज.प.चा धर्माधिष्ठित सांस्कृतिक भारत का उदारमतवाद्यांचा/'प्रागतिकांचा' निधर्मी भारत? नकाशावरचा भौगोलिक भारत काश्मीरच्या एक-तृतीयांश जनतेला मान्य नाही हे गृहमंत्र्यांचे लोकसभेतील विधान ताजे आहे. या काश्मिरींना प्रभुत्ववादी सांस्कृतिक भारतही अर्थातच अमान्य तसाच भौगोलिक/सांस्कृतिक भारत ईशान्येच्या काही प्रदेशात आणि नक्षलवादी लाल कॉरिडॉरमध्ये अमान्य.

याला जोडून संविधान. संविधान भौगोलिक भारतापुरते मर्यदित आहे. मुळात तोच भारत विवाद्य असेल तर संविधानही अस्थिर होते. [परत काश्मीर - कलम ३७०]. संविधानाच्या प्रश्नाला आणखी एक पैलू आहे. संविधान त्रिकालाबाधित सत्य आहे हा इहवादी दृष्टिकोन नाही. संविधान म्हणजे नवीन मनुस्मृती नाही. हा मुद्दा स्वतंत्र लेखाचा विषय होईल.

मूलतत्त्ववाद

अलीकडच्या काळातील मूलतत्त्ववादाचा उदय ही समाजाच्या दृष्टीने चिंताजनक प्रक्रिया आहे. पण मूलतत्त्ववाद म्हणजे नक्की काय हे संदिग्ध आहे. त्याचा परिणाम राजकीय discourse व्यस्त होण्यात दिसतो. उदा. हिंदुत्ववाद कोठे संपतो आणि हिंदू मूलतत्त्ववाद कोठे सुरू होतो हे स्पष्ट व्हावे. ममता बॅनर्जींना जय श्रीराम ऐकवणे आणि जय श्रीराम म्हणत नाही म्हणून एका मुस्लिमाला झुंडीने ठार मारणे यात गुणात्मक फरक आहे. पण या संदिग्धतेचा गैरफायदा राजकीय पक्ष घेतात. राहुल गांधी देवदर्शनासाठी मी हिंदू, गोत्र अमुक अमुक सांगतात; साध्वी प्रज्ञा ठाकूर नथुराम गोडसेंचा उदो उदो करतात तर ममता बॅनर्जी नुसरत जहानला रथयात्रेसाठी बोलावतात. म्हणजे सगळेच हिंदुत्ववादी! अशा चित्रात जन-आंदोलनांनी निश्चित भूमिका घेणे आवश्यक आहे.

निरीक्षण

आंदोलन ही चिरंतन प्रक्रिया आहे असे डॉ. राम मनोहर लोहिया म्हणत असत. त्या मापदंडावर आजवरच्या आंदोलनांच्या प्रवासाचा ताजा सम्यक ताळेबंद आवश्यक दिसतो.

art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk